संक्षिप्त फौ. ख. क्र. १४/२०२०
सरकार वि. दिपक शेवाळे.
निशाणी– २९.

**<u>सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०४ ची जबानी.</u>**
**<u>मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,</u>**

**<u>माझे नाव</u>** — बापू हिरामण चव्हाण,
**<u>वय</u>**– ५५ वर्ष– धंदा– ए. एस. आय ब. क्रं. २२७०,
**<u>नेमणूक</u>** — वडनेर खापूर्डी पोलीस स्टेशन, ता. मालेगाव, जि. नाशिक.
..........................................................................................................

**<u>सरकारपक्षाच्या वतीने साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. आर. एम. वाळके यांच्या मार्फत शपथेवर सुरु.</u>**

**०१.** दिनांक ०५/०२/२०१९ रोजी मी पोलिस स्टेशन चांदवड येथे पोलिस हवालदार म्हणून कार्यरत होतो. त्या दिवशी तोंडी आदेशावरुन मला गुन्हा क्रं. १७/२०१९ कलम ३०४(अ), २७९, ३३७, ३३८, कलम १८४ मोटर वाहन कायदा नुसार तपास माझ्याकडे प्राप्त झाला होता. मी त्यानंतर कागदपत्रांचे अवलोकन केले व मी दिनांक ०६/०२/२०१९ रोजी घटनास्थळी जाउन दोन पंचासमोर पंचनामा केला होता. आता मला घटनास्थळ पंचनामा नि. क्रं. २३ दाखविण्यात आला त्यावर माझी व दोन पंचाची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. मी साक्षीदारांचे त्यांच्या सांगण्याप्रमाणे जवाब नोंदवून घेतले. साक्षीदार जमशेर शब्बीर पठाण याचा जबाब त्याच्या सांगण्याप्रमाणे नोंदवून घेतला होता. अपघात करणारी ब्रिजा गाडी क्रं. एम.एच ४१–ए. एस. –४१४२ ही सटाणा तालुक्यातील लखमापूर गावातील असल्याचे समजल्यावरुन त्या ठिकाणी जाउन शोध घेतला मात्र गाडी व गाडी चालक मिळून आला नाही. त्या ठिकाणी पोलिस स्टेशनला हजर होण्याबाबत निरोप ठेवून आलो होतो. त्यानंतर दिनांक ११/०२/२०१९ रोजी अपघात करणारा आरोपी गाडीसह पोलिस स्टेशनला हजर झाल्यावरुन त्याला गुन्हयाची थोडक्यात हकिकत सांगितली व मो. वाहन कायद्याप्रमाणे नोटीस दिला. आता मला ती नोटीस दाखवला. त्यावर माझी व आरोपीची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्याला **नि. क्रं. ३०** देण्यात आला. मी आरोपीला अटक केली होती. मला आरोपीविरुध्द पुरावा मिळून आल्याने न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. मी उप प्रादेशीक परिवहन अधिका–याना तांत्रीक तपासणीकरीता पत्र दिले होते. आता मला ते पत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्याला **नि. क्रं. ३१** देण्यात आला. त्यानंतर तपासणी अहवाल प्राप्त झाला होता व तो मी दोषारोपपत्रासोबत समाविष्ट केला आहे. आरोपीला पाहिल्यास मी ओळखू शकतो. आज न्यायालयात आरोपी हजर आहे.

**सरतपास संपला.**

**<u>उलटतपास आरोपी तर्फे श्री. व्ही. एस. पाटील यांच्यामार्फत सुरु.</u>**

०२. हे म्हणणे खरे आहे की, आडगाव टप्पा या ठिकाणी चौफूली आहे व त्या ठिकाणी आडगाव गावाकडे व भरविहीर गावाकडे जाणारा रस्ता आहे व त्याठिकाणी वेग प्रतिबंधक लावलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या ठिकाणी चौफूली व वेग प्रतिबंधक असल्याने येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांची गती कमी असते. हे म्हणणे खरे नाही की, मी तपासलेले सर्व साक्षीदार हे फिर्यादी व मयताचे ओळखीचे व जवळचे नातेवाईक आहेत. घटनास्थळाच्या चतुःसिमा मला सांगता येतील. पुर्व – पच्छीम रस्ता आहे, उत्तर – आडगाव गावाकडे जाणारा रस्ता, दक्षिणेस – रस्त्यापलीकडे महाराणा हॉटेल आहे. हे म्हणणे खरे नाही की, साक्षीदार शिशीर यशवंते हा फिर्यादीच्या घरा शेजारी राहणारा आहे. मी शिशीर यशवंते याला पंचनाम्याकरीता लेखी नोटीस दिला नव्हता. पंचनामा दिनांक ०६/०२/२०१९ रोजी नोंदविला होता. हे म्हणणे खरे आहे की, अपघात ग्रस्त वाहन ब्रिजा मला घटनास्थळी मिळून आले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, तपासात मला प्रत्यक्ष दर्शी कोणताही साक्षीदार मिळून आला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आडगाव टप्प्यावर माहाराणा हॉटेल व लहान मोठी दुकाने आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी साक्षीदार यांचे जवाब माझ्या मनाप्रमाणे नोंदविले आहे. हे म्हणणे खरे नाही की, जमशीर शब्बीर पठाण याचे बयाण त्याच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, साक्षीदाराचे जवाब पोलिस स्टेशनमध्ये नोंदविले होते. साक्षीदार सांगतो की, साक्षीदारांना बोलावून नोंदविले होते. मी पाच साक्षीदारांना बोलाविले होते. मला त्यांची पूर्ण नावे सांगता येणार नाही. मी फाईल बघूण सांगू शकतो. हे म्हणणे खरे नाही की, अज्ञात वाहनाच्या धडकेत भाउराव जाधव याचा मृत्यू झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, ब्रिजा गाडी घटनेच्या दिवशी कोण चालवीत होता हे बघणारा कोणताही प्रत्यक्ष दर्शी साक्षीदार मिळून आला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मला कोणताही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार मिळून आलेला नसतांना आरोपीविरुध्द खोटे दोषारोपपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात संपुर्ण खोटे कथन केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास काहीनाही.**
सा.वा.दा.ब.अ.क.केले.

समक्ष

Digitally signed by SUMIT SURESHCHANDRA CHHALLANI
Date: 2025.12.19 19:19:41 +0530

**(एस.एस.छल्लाणी)**
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
न्या.क्र.१, चांदवड
**दिनांक – १९/१२/२०२५**

Digitally signed by SUMIT SURESHCHANDRA CHHALLANI
Date: 2025.12.19 19:19:37 +0530

**(एस.एस.छल्लाणी)**
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
न्या.क्र.१, चांदवड